# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ३१/०३/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### सुगंधित तंबाखुची अवैध वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ३१/०३/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. चे पथक सावनेर उपविभागात फरार व पाहीजे आरोपी शोध तसेच अवैध्यरित्या धंदयावर रेड कामी पेट्रोलींग करीत असतांना पोस्टे खापा हद्दीत मुखबीर व्दारे खात्रीशिर खबर मिळाली कि, पांढऱ्या रंगाची इनोव्हा गाडीमध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगंधीत तंबाखुची वाहतुक करीत मध्यप्रदेश येथुन बडेगाव, मार्ग खापा च्या दिशेने येत आहे. करिता स्थानिक गुन्हे शाखेचे पथक फॉरेस्ट नाका येथे पोहचुन नाकाबंदी केली असता दि. ३१/०३/२०२२ चे ०१/२० वा. दरम्यान इनोव्हा गाडी नाकाबंदीच्या दिशेने येतांना दिसले. त्या वाहन चालकास नाकाबंदीच्या ठिकाणी थांबवुन गाडी पाहीले असता टोयोटा कंपनीची इनोव्हा गाडी क्र. एम.एच–१८/ए.वाय– ४७७७ दिसुन आले. गाडी चालकास विचारले असता गाडी चालकाने आपले नाव १) आकाश रामबाबु शाहु, वय २५ वर्ष, रा.कस्तुर्बा नगर दयानंद पार्क प्लाट नं २३ जरीपटका नागपुर व वाहकाने आपले नाव २) शभम राजु दिगरसे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र ०८ वडचिचोली. ता.पांढुर्णा जि.छिंदवाडा मध्यप्रदेश असे सांगीतले. सदर वाहनाची गाडीची पाहणी केली असता गाडीचे चालक सिट च्या मागे प्लास्टिक चुमडीत खर्रा बनविण्या करीता वापरात येणारा सुंगधीत तंबाखु दिसून आले.

**जप्त करण्यात आलेला माल**

१) गोल्डन सफारी प्रत्येकी ०१ कि.ग्रा. सुगंधीत तंबाखु असे एकुण १५५ नग एकुण १५५ कि.ग्रा. प्रत्येकी ५५० रू प्रमाणे असे एकुण कि. ८५,२५०/–रु.

२) गोल्ड आर जी २० प्रत्येकी १ कि.ग्रा. सुगंधीत तंबाखु असा एकुण ५७ किलो प्रत्येकी ६०० रू प्रमाणे किं. ३४,२००/–रू.

३) रिमझीम ०१ कि.ग्रा. सुगंधीत तंबाखु एकुण ३५ किलो प्रत्येकी ५५० रू प्रमाणे असा एकुण किं. १९,२५०/–रू.

४) टोयोटा कपनीची इनोव्हा गाडी क्र. एम.एच.१८ ए.वाय ४७७७ कि. १३,००,०००/–रु.

आरोपीतांच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना असा एकुण १४,३८,७००/– रु. चा मुददेमाल मिळुन आला. आरोपीतांनी सुगंधीत तंबाखु गोविंद धान्य भंडारे किराणा दुकान चे मालक गोविंद खेमानी रा. बजाज नगर नागपुर याचे सांगणे वरुन दिपक पाटील रा. लोधीखेडा ता. सौसर जि. छिंदवाडा येथुन आणला आहे.

सुगंधीत तंबाखु व पानमसाला याचे सेवनाने मानविजिवीतास अपायकारक, हानीकारक व घातक ठरत असल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात सुगंधीत तंबाखु व पानमसाला याच्या उत्पादन साठा, वितरण, विक्रीस, वाहतुकीस निर्बंध घातलेला आहे. हे आरोपीतांना माहीत असतांना सुध्दा यातील आरोपीतानी संगणमत करुन स्वताचे आर्थिक फायदयाकरीता जानिवपुर्वक विक्री करता विनापरवाना अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांवर कलम १८८ ,२७२ ,२७३ व ३२८ भा.द.वि. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही श्री. विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी राजीव कर्मलवार, पो.हवा.राजेंद्र रेवतकर, नापोशी आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर